# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जळगांव शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन गेले तीन वर्षापासून बंद असल्याबाबत

**(१) २६३२ (१५-०१-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये सीटी स्कॅन मशीन दोन ते तीन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नादुरुस्त मशीन दुरुस्त करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा रुग्णालय जळगाव येथील सी.टी.स्कॅन मशीन कालबाह्य झाल्याने सदर मशीन निर्लेखित करण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, जळगाव यांच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या राज्याच्या प्रस्तावित आराखडयामध्ये राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत

**(२) २६८२ (१५-०१-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या राज्याच्या प्रस्तावित आराखडयामध्ये राज्यातील ३० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ७९ आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम धरण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र कोणकोणत्या ठिकाणी प्रस्तावित आहेत तसेच निधी अभावी वरील केंद्रोच कामे सुरु होऊ शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त, केंद्राना निधी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत व सदर केंद्राना तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे व या केंद्राच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) मुळ आराखड्यामध्ये ७९ उपकेंद्राचे बांधकाम प्रस्तावित आहे. व पुरवणी आराखड्यांमध्ये ३४ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ८० आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम प्रस्तवित आहे.
(२) हे खरे नाही.

धुळ, जळगाव, नंदुरबार, औरंगाबाद, बीड, जालना, नांदेड, हिंगोली, गडचिरोली , ठाणे, नाशिक, परभणी, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर येथे आरोग्य उपकेंद्र प्रस्तावित आहेत व ठाणे, रायगड, रत्नागिरी, पूणे, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड, बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली वर्धा येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र प्रस्तावति आहेत.
(३) मंजूर आरोग्य उपकेंद्रांना निधी प्राप्त असून बांधकाम प्रगतीपथावर आहेत.

---

**पालघर जिल्ह्यातील खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी आदिवासी महिलांना ताटकळत ठेवण्यात आल्याबाबत**

**(३) ३२९० (२३-१२-२०१४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी आदिवासी महिलांना दोन दिवस उपाशीपोटी ताटकळत ठेवण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निष्णात वैद्यकीय अधिकारी, पुरेशा सुविधा आणि नियोजनाचा अभाव असतानाही या शिबीराचे आयोजन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शिबीरासाठी नाशिक जिल्ह्यातून दोन दिवसानंतर वैद्यकीय अधिकारी आणण्यात आले आणि त्यांनी अवघ्या तीन तासाच्या कालावधीत ३४ महिलांवर शस्त्रक्रिया केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
दि. १८.११.२०१४ रोजी रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना जेवण व अल्पोपहार पुरविण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

दि. १८.११.२०१४ रोजी सकाळी ८.३० ते ८.४० च्या दरम्यान एकूण ३८ महिला रुग्णांपैकी वातानुकूलीत यंत्रामध्ये बिघाड तसेच विदयुत सेवतेतील त्रुटी या कारणांमुळे फक्त सहा महिला रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यात आली. उर्वरित ३२ महिला रुग्णांची दि. १९.११.२०१४ रोजी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आली.

(४) उपसंचालक, ठाणे मंडळ, ठाणे यांचे स्तरावरुन डॉ. दुटे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळा यांना दि. ३०/०५/२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

---

**खालापूर तालुक्यातील (जि. रायगड) जांबरुंग धरणाचे काम**
**गेल्या ३४ वर्षापासून रखडल्याबाबत**

**(४) ३५१० (२३-१२-२०१४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि. रायगड) जांबरुंग धरणाचे काम गेल्या ३४ वर्षापासून रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेकरिता आतापर्यंत सुमारे ३५ कोटी रुपये खर्च झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे धरणाचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर धरणाचे काम केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) जांबरुंग धारणाचे कामासाठी वनजमीन भुसंपादनाचे काम प्रगतीपथावर असून आजपावेतो यावर रुपये १३.९४ लक्ष इतका खर्च झाला आहे.

(३) व (४) सदर धरणाचे बुडीत क्षेत्रात वनजमीन येत असल्याने वनसंवर्धन कायदा १९८० अन्वये योजना बंद पडली. तद् नंतर योजनेस पर्यायी वनेत्तर जमीन उस्मानाबाद जिल्हयातून मौजे चिंचपूर (ता. परांडा) येथून प्राप्त झाली आहे. वनजमीन संपदनासाठी केंद्र शासनाचे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ चे पत्रान्वये तत्वत: मंजुरी मिळाली आहे. यासाठी वनखात्यामध्ये रक्कम जमा करावयाची आहे. ही रक्कम अदा करण्यासाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांना कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, ठाणे यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी देयक सादर केले आहे. या योजनेच्या प्रस्तावास केंद्र शासनाची विधीवत मान्यता प्राप्त होताच काम सुरु करुन निधी उपलब्धतेनुसार जून, २०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

### नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करणेबाबत

**(५) ३६१९ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील बिलोली या तालुक्याच्या ठिकाणी वैद्यकिय सोयीच्या दृष्टीने ग्रामीण रुग्णालय हे अपूरे पडत असल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय लक्षात घेवून बिलोली येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) बिलोली, जि.नांदेड येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करावयाचा प्रस्ताव निकषानुसार तपासून सादर करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांना आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २७.०१.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### आमगाव तालुक्यातील (जि.गोंदिया) रुग्णालयांमध्ये जीवनदायी योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळत नसल्याबाबत

**(६) ४२०० (२३-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव तालुक्यातील (जि.गोंदिया) रुग्णालयांमध्ये जीवनदायी योजनेंतर्गत हृदय शस्त्रक्रिया केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनातर्फे मिळणारी आर्थिक मदत संबंधित रुग्णालयांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक हृदयविकाराचे रुग्ण अद्यापही शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत तातडीने आर्थिक मदत रुग्णालयांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१) राज्यात २१ नोव्हेंबर, २०१३ पासून जीवनदायी आरोग्य योजना बंद करण्यात आली असून नवीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यात आली आहे. या दोन्ही योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील आमगांव तालुक्यातील एकही रुग्णालय अंगीकृत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हा रुग्णालयामध्ये कॅन्सरवरील उपचार सुविधा व तज्ज्ञ या दोन्ही बाबी उपलब्ध नसल्याबाबत**

**(७) ४७९३ (२३-१२-२०१४). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्करोग (कॅन्सर) हा नोटीफाईड डिसीज (ज्या आजारांची खबर शासनाला देणे आवश्यक असते असा आजार) नसल्याने शासन पातळीवर याबाबत दुरवस्था दिसून येत आहे, भंडारा जिल्हा रुग्णालयामध्ये आज कॅन्सरवरील उपचार सुविधा व तज्ज्ञ या दोन्ही बाबी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) शासकीय पातळी वरुन किमान जी जाणीव जागृती व्हावयास हवी त्याचाही प्रचंड अभाव आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेली प्राथमिक आरोग्य केंद्र तर कॅन्सरबाबत काहीच दक्षता घेताना दिसत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. भंडारा जिल्हयात सन २०१३-१४ या वर्षात उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयात कर्करोग निदानासाठी विशेष शिबिरे घेण्यात येऊन १४० संशयित रुग्ण शोधून काढण्यात आले. त्यांची जिल्हा रुग्णालयात तपासणी करण्यात आली असून त्यातील २४ जणांना जिल्हा रुग्णालयात केमोथेरपी देण्यात आली आहे.

कर्करोगाच्या जनजागरणा करीता विविध रुग्णालयात बॅनर्स / पोस्टर्स लावण्यात आले असून दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन त्यामध्ये लोकांना भाषण, चलचित्र, माहितीपत्रक याद्वारे कर्करोगाची माहिती देण्यात येते. तसेच राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आरोग्य सेवक / सेविका मार्फत गृहभेटीद्वारे जनजागृतीचे कार्य केले जाते व संशयित रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपजिल्हा / जिल्हा रुग्णालयात संदर्भसेवा देण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेला विभागीय प्रयोगशाळेचा दर्जा देण्याबाबतची मागणी**

**(८) ५९८८ (०६-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेला विभागीय प्रयोगशाळेचा दर्जा देण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) उपसंचालक, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा यांचेडून परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आखतवाडे (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील साठवण बंधारे गेल्या ५-७ वर्षापासून नादुरुस्त असल्याने त्यात पाणी साठा होत नसल्याबाबत**

**(९) ७७५० (०७-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : तारांकित प्रश्न क्रमांक १८६६ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी उत्तरीत झालेल्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आखतवाडे (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील साठवण बंधारे गेल्या ५-७ वर्षापासून नादुरुस्त असल्याने त्यात पाणी साठा होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या नादुरुस्त असलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याकरिता वारंवार ग्रामस्थांनी संबंधितांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, प्रश्नोक्त विषयानुषंगाने सभागृहाला आश्वासित केल्यानुसार कार्यवाहीची माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंतची वस्तुस्थिती काय,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
मौजे आखतवाडे (ता.पाचोरा, जि.जळगांव) गावच्या शिवच्या शेजारी असलेल्या नगरदेवळा या गावाच्या शिवमध्ये ४ साठवण बंधाऱ्यांची कामे जिल्हा परिषद, जळगांव यांचेमार्फत पूर्ण करण्यात आलेली आहेत.
(२) अशा प्रकारचे निवेदन आढळून आले नाही.
(३), (४) व (५) सन २००९ च्या अतिवृष्टीमुळे आखतवाडे गावचे शिवेच्या शेजारी असलेल्या नगरदेवळा येथील तीन साठवण बंधारे नादुरुस्त झाले आहेत. सदर कामांची दुरुस्तीची अंदाजपत्रके कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांना प्राप्त झालेली आहेत. निधी प्राप्त होताच सदर कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**पुणे जिल्हयासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या निधीबाबत**

**(१०) ९६७६ (०७-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत किती निधी दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर प्राप्त झाला आहे,

(२) असल्यास, उक्त निधी खर्च करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी नियोजित कामाऐवजी इतरत्र वळवून वा दुस-या कामासाठी वापरण्यात आला आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१५) :** (१) व (२) पुणे जिल्ह्यास राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाकरीता दि. ३१ मार्च, २०१४ अखेर एकूण रु. ३५७८.७५ लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यापैकी मार्च २०१४ अखेर रु.२९६८.२६ लक्ष इतका खर्च करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

---

**ग्रामीण भागातील आरोग्य सेवा शहरी भागाप्रमाणे दर्जेदार करण्याच्या दृष्टीने "टेली मेडीसीन" सेवा अमरावती जिल्ह्यातील मेळघाटापासून सुरु करण्याबाबत**

**(११) १०१२५ (०७-०४-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा शहरी भागाप्रमाणे दर्जेदार करण्याच्यादृष्टीने ‘टेली मेडिसिन’ सेवा अमरावती जिल्ह्यातील मेळघाटापासून सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यशासनाच्या विचाराधीन असल्याप्रश्नाबाबत निर्णय घेवून अंमलबजावणी करण्यात आली काय,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणताच निर्णय झाला नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात सन २००९-१० पासून जिल्हा रुग्णालयात व सन २०११-१२ पासून मेळघाट परिसरातील उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे टेलिमेडिसीन सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच माहे फेब्रुवारी २०१५ पासून मेळघाटातील सेमाडोह जि.अमरावती येथून अत्याधुनिक पध्दतीची टेलिमेडीसीन सेवा प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्याबाबत

**(१२) ११०२९ (०६-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोड), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान माहे जानेवारी, २०१५ पासून राबविण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियानामध्ये कोणत्या निकषावर जिल्ह्यातील किती गावांचा समावेश करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, अभियांनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधीपासून करण्यात आली व करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

शासननिर्णय दि. ५ डिसेंबर, २०१४ अन्वये राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

(२) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत दुष्काळी परिस्थिती/ टंचाई घोषित गाव, ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी, टँकरने पाणीपुरवठा होणारे गाव, अति शोषित (Over Exploited) पाणलोटतील गाव इत्यादी निकषाच्या आधारे उस्मानाबाद जिल्ह्यात २१७ गावांचा जलयुक्त शिवार अभियानामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

(३) अभियानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी शासननिर्णय दि. ५ डिसेंबर २०१४ नुसार करण्यात येत आहे.

---

## शासनाने ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य सुरक्षित व्हावे याकरीता आशा कार्यकर्ता महिलांची निवड केल्याबाबत

**(१३) ११३२९ (०६-०४-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य सुरक्षित व्हावे याकरीता आशा कार्यकर्ता महिलांची निवड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत महिलांना मासिक मानधन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आशा कार्यकर्तांमुळे ग्रामीण महिलांचे आयुष्यमान उंचावले आहे व कुटुंब नियोजनाच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुटुंब नियोजनाकरिता महिलांना आणणा-या आशा कार्यकर्त्यांना एका महिलेकरिता १५० रुपये इतके अत्यल्प मानधन मिळते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आशा कार्यकर्त्यांना मासिक मानधन, कुटुंब नियोजन मोबदला मिळण्याकरिता शासनाने काही कार्यवाही केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१५) :** (१) होय, आशा स्वयंसेविका ही सामाजिक कार्यकर्ती असून आरोग्य विषयक सेवा तळागाळातील व दुर्बल घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी तिची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) आशा स्वयंसेविकेस ४८ बाबींपैकी तिने केलेल्या कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येत असून त्यांना मासिक मानधन देण्यात येत नाही.

(३) होय, आशा स्वयंसेविका व राष्ट्रीय आरोग्य अभियानातील विविध उपक्रमांमुळे आरोग्य संस्थामधील प्रसूतीचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच प्रसूतीपुर्व व प्रसूती पश्चात सेवा, पौगांडवस्थेतील किशोरवयीन मुलींना सेवा तसेच कुटूंब कल्याणाच्या सेवा उपलब्ध होत आहेत. त्यामुळे आरोग्य विषयक बाबींमध्ये महिला सुरक्षित होत आहे.

(४) व (५) अंशत: खरे आहे. आशा स्वयंसेविकेला कुटुंबनियोजनासाठी प्रत्येक महिलेमागे देण्यात येणार रु.१५० हे मानधन वाजवी असुन ते वेळोवेळी अदा करण्यात येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अशा स्वयंसेविकांना मासिक मानधन अनुज्ञेय नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दासगाव व गोंदिया तालुका कृषी अधिकारी गोंदिया यांच्या अधिनस्थ असलेल्या मंडळ क्षेत्रातील गावात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१४) १२९९३ (०८-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दासगाव व गोंदिया तालुका कृषी अधिकारी गोंदिया यांच्या अधिनस्थ असलेल्या मंडळ क्षेत्रातील एकूण ८८ गावे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन अंतर्गत भात खाचरेचे काम राबवियात आले असून यामध्ये दासगाव मंडळातील ७४ गावे व गोंदिया मंडळातील १३ गावांचा समावेश होता या गावांची निवड शासनस्तरावर सन २०१०-११ मध्ये करण्यात आली परंतु स्थानिक कृषी अधिकारी यांच्या दिरंगाईमुळे अंमलबजावणी सन २०१४-१५ मध्ये गावांतील पाणलोट समितीच्या माध्यमातून करण्यात आली, परंतु या कामामध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाला असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०६-२०१५) :** (१) गोंदिया तालुका कृषि अधिकारी गोंदिया यांच्या अधिनस्त असलेल्या दोन मंडळ क्षेत्रातील एकूण ८७ गावे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन अंतर्गत भात खाचराचे काम राबविण्यात आलेले असून यात स्थानिक कृषि अधिकारी यांची अंमलबजावणी मध्ये दिरंगाई झालेली नाही. सन २०१४-१५ मध्ये गावातील पाणलोट समितीच्या माध्यमातून कामे करण्यात आलेली आहेत. सदर कामे करतेवेळी तक्रार प्राप्त झालेली होती.

(२) सदर तक्रार प्राप्त अर्जानुसार प्राथमिक चौकशी करण्यात आलेली असून तक्रारदाराने केलेली तक्रार गैरसमजुतीने केल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसे तक्रारदाराने लेखी निवेदन दिलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यासाठी एनआरएचएम अभियानाच्या योजेनेसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मागितला असता केवळ २५ कोटींचा निधी देण्यात आल्याबाबत**

**(१५) १४४७२ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यासाठी एनआरएचएम अभियानाच्या योजनेसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मागितला असता केवळ २५ कोटींचा निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर अभियानाच्या योजना राबविताना अडथळा निर्माण होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१४-१५ अंतर्गत सातारा जिल्ह्याने एनआरएचएम अंतर्गत ३६.५२ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला होता. त्यावर केंद्र शासनाच्या कार्यक्रमनिहाय मंजुरीनुसार सातारा जिल्ह्यास २५.६३ कोटी इतका निधी सन २०१४-१५ करीता उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाकोली, शेंबवणे, गावडी, भंडारवाडी व बुरंबाळ (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघुपाटबंधारे तलाव (स्थानिक स्तर) अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(१६) १४७८९ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकोली, शेंबवणे, गावडी, भंडारवाडी व बुरंबाळ (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघुपाटबंधारे तलाव (स्थानिक स्तर) अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकोली योजनेचे काम गेली ३ वर्षापासून पूर्णपणे बंद आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंधारण विभागाकडे आर्थिक मापदंडात बसत नसल्यामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेला लागू केला जाणारा आर्थिक मापदंड हा सन २००९-१० मधील किंमतीनुसार निश्चित केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सद्यःस्थितीमध्ये वस्तूंच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने आर्थिक मापदंडामध्ये वाढ करण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासन पुणे विभागाला नवीन आर्थिक मापदंड लागू करून सदर योजनेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता देणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०९-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.

सदर योजनेचे काम ८०% पूर्ण झाले असून विमोचकाचे काम ६०% पूर्ण झाले आहे. मार्च २०१५ अखेर योजनेवर रु. ४६४.९८ लक्ष इतका खर्च झाला आहे.

(३) नाही.

सुधारीत प्रशासकीय मान्यता दि. ३ ऑक्टोबर, २०१२ रोजी देण्यात आलेली आहे.

(४) नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड येथील मोहननगर भागातील राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत चालू (ESIS) रूग्णालयातील कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान देण्याबाबत**

**(१७) १५१६० (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड येथील मोहननगर भागातील राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत चालू (ESIS) रूग्णालयातील कर्मचाऱ्याकरिता पुरेशा शासकीय निवासस्थाने उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवासस्थानांचा प्रस्ताव मंजूर होऊनही आजपर्यन्त निवासस्थाने का बांधण्यात आली नाहीत,
(३) असल्यास, निवासी डॉक्टरांची दोन पदे मंजूर असूनही केवळ एकच भरले गेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाबींची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१५) :** (१) होय.
(२) नाही. सन २००९ मध्ये मोहन नगर, पुणे येथे निवासस्थाने बांधण्याकरीता केंद्र शासनाच्या राज्य कामगार विमा महामंडळास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या राज्य कामगार विमा महामंडळ यांच्याकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

आता, वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मोहन नगर, पुणे यांनी सुधारीत प्रस्ताव सादर केला आहे.

(३) नाही.

सदर रुग्णालयाकरिता निवासी डॉक्टरांचे एकच पद मंजूर असून ते भरण्यात आले आहे.
(४) व (५) राज्य कामगार विमा योजनेच्या "राज्य कार्यकारी समिती" च्या पुढील बैठकीत निवासस्थान बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.
(६) राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी प्रस्तावित केल्यानुसार राज्य कामगार विमा योजना केंद्र शासनास हस्तांतरण करण्याबाबत निर्णय घेतला होता. तथापी, हस्तांतरणाची कार्यवाही प्रलंबित राहील्याने धोरणात्मक निर्णय होऊ शकला नाही.

---

**माणगांव (कुडाळ) खो-यांतील हत्तीपकड मोहिमेकरिता हत्तीच्या सोयीसुविधांसाठी वन विभागाने निधीसाठी पाठविलेला प्रस्ताव**

**(१८) १६७१३ (१७-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (कुडाळ) खो-यांतील हत्तीपकड मोहिमेकरिता हत्तीच्या सोयीसुविधांसाठी पुरेसा निधी नसल्याने वन विभागाने निधीसाठी पाठविलेला प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्याचे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावित मागणी बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) माणगांव (कुडाळ) खोऱ्यातील हत्ती पकड मोहिमेकरीता माहे मार्च, २०१५ मध्ये केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत रु. ३८.२० लक्ष व जिल्हा योजनाअंतर्गत रु. १८.३५ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच सन २०१५-१६ करिता कॅम्पा अंतर्गत माहे मे. २०१५ मध्ये रु. १०.०० लक्ष व माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये १५.४४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाग, साप, अजगर या प्राण्यांचा वन्य प्राणी तालीकेत समावेश करणेबाबत**

**(१९) १७२७७ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाग, साप, अजगर या प्राण्यांचा वन्य प्राणी तालीकेत समावेश करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, सर्प दंशामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्याबाबत विधान सभेत चर्चा झाली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१५) :** (१) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मध्ये अजगर अनुसुची-I मध्ये नाग, नागराज, घोणस हे अनुसुची-II मध्ये इतर सर्व सर्प अनुसुची-IV मध्ये वन्यप्राणी म्हणून समाविष्ट आहेत.
(२) होय, हे खरे आहे काय,
(३) व (४) सर्प दंशामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसास आर्थिक मदत देण्याबाबत राज्य वन्यजीव मंडळाच्या दि. २०.२.२०१४ रोजीच्या बैठकीत निर्णय झाला आहे आणि त्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर संस्करण चालू आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील प्रामुख्याने जुन्नर आणि शिरुर तालुक्यात पाणी व भक्ष्याच्या शोधात सहा महिन्यात ९ बिबट्यांचा झालेला मृत्यू**

**(२०) १८८७४ (१४-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील प्रामुख्याने जुन्नर आणि शिरुर तालुक्यातील बेसुमार वृक्षतोडीमुळे जंगलातील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत व ओढे-नाले लुप्त होत असल्याने पाणी व भक्ष्याच्या शोधात सहा महिन्यात ९ बिबट्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बिबट्यासह अन्य वन्य प्राण्यांना पाण्यासाठी वनतळी बांधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, वन्यप्राण्यांना वनतळी बांधण्यासाठी कोट्यावधी रुपयांची तरतूद करूनही अद्यापही अनेक ठिकाणी अशी वनतळी विकसित झालेली नाहीत त्यामुळे गेल्या काही वर्षात बिबट्याचे मानवी वस्तीत येण्याचे प्रमाण वाढले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) पुणे जिल्ह्यातील जुन्नर वन विभागात डिसेंबर २०१४ पासून जून २०१५ पर्यंत जुन्नर तालुक्यात - ५, शिरुर तालुक्यात - ३ तर आंबेगाव तालुक्यात - १ अशा एकूण ९ बिबटयांचा मृत्यू झाला असून त्यापैकी रस्ता अपघातात १, पाण्यात बुडून ६ व २ बिबटे नैसर्गिकरित्या मृत पावलेले आहे.
(२) व (३) जुन्नर वन विभागात गत ३ वर्षात वनक्षेत्रात व वनक्षेत्राबाहेर वन्यप्राण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेसाठी जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत त्यात ४१ वनतळी व २९ पाणस्थळांची निर्मिती करण्यात आली आहे. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे वन्यप्राण्यांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या नाही. तथापि बिबट्याचे वावर मानवी वस्तीचे जवळील ऊस व केळीच्या शेतात असल्याचे निदेर्शनास आले आहे.

(४) जलसंधारण कार्यक्रमांतर्गत वनतळी व पाणस्थळांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच बरोबर बिबट्याचे वास्तव्य असलेल्या गावांमध्ये जनप्रबोधन करणे, बिबटे हल्ल्यापासून घ्यावयाच्या दक्षतेबाबत पोस्टर्स, घडीपत्रके, दृक-श्राव्य माध्यमांद्वारे जनजागृती करणे, बिबट्याचे मानवी वस्तीत अस्तित्वावरील नियंत्रणसाठी बचाव पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

---

**मुरबाड कर्जत (ता.कर्जत, जि.रायगड) येथील रस्ता रुंदीकरणाचे काम**
**वन विभागाने जमीन न दिल्यामुळे रखडले असल्याबाबत**

**(२१) १९०४३ (१४-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड कर्जत (ता.कर्जत, जि.रायगड) येथील रस्ता रुंदीकरणाचे काम वन विभागाने जमीन न दिल्यामुळे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने दिड किलोमीटरच्या रस्त्याबाबतचा प्रस्ताव वन विभागाकडे आठ महिन्यापूर्वी पाठवूनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाने कार्यवाही न करण्याची कारणे काय,

(४) असल्यास, सदर रस्ता पूर्ण होण्याकरिता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) व (२) कर्जत-मुरबाड रस्त्याचे रुंदीकरणाकरीता आवश्यक वनजमिन मागणीचा प्रस्ताव, प्रकल्प यंत्रणकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अद्याप पर्यंत वन विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुडाळ तालुक्यातील वसोली गावातील वन संज्ञेखाली हजारो झांडाची**
**तोड करण्यात आल्याबाबतची तक्रार**

**(२२) १९५१५ (१७-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील वसोली गावातील वन संज्ञेखाली सर्वे नं ३६ व ६३ मध्ये हजारो झांडाची तोड करण्यात आल्याबाबतची तक्रार ग्रामस्थानी सावंतवाडी उपवनसंरक्षक यांच्याकडे माहे मे, २०१५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसोली गावातील वनसंज्ञेखालील येणारी झाडे माणगाव खोरे या जैवविविधतेने संपन्न असलेल्या खो-यातील असल्याचे ओळखले जाते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वनसंज्ञेत वनेत्तर काम करु नये असा शासनाचा दंडक असतानाही खुले आम वृक्षतोड करण्यात येत असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वन विभागानी काय कार्यवाही केली व दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) वनसंज्ञा क्षेत्रामध्ये वनेतर काम करण्यास मनाई आहे, हे खरे आहे. मौजे वसोली, ता.कुडाळ येथील वनसंज्ञा सर्वे नं ३६ ते ६३ मधील अवैधरित्या ५७६ झोड तोडल्याचे निदर्शनास आल्याने वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, कुडाळ यांनी महाराष्ट्र वृक्षतोड (विनियम) अधिनियम, १९६४ अंतर्गत आरोपीकडून रु. २४ हजार इतका दंड वसूल केला आहे. तसेच अवैध वृक्षतोडीतील २१८.४६५ घ.मी. जळावू किटा वनोपज सरकारजमा केले आहे.

विनापरवाना वाहतूक केल्याने भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये ५ आरोपींकडून प्रत्येकी रु. ५ हजार याप्रमाणे रु. २५ हजार वसूल करण्यात आले आहेत.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात हत्तींकडून झालेले नुकसान व जिवितहानी

**(२३) २०३४९ (१४-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात २००२ मध्ये दाखल झालेल्या हत्तींकडून मोठ्याप्रमाणात नुकसान व जिवितहानी झाल्यामुळे हत्ती पकडण्याची मोहिम आखण्यात आल्यानंतर दुसऱ्यांदा राबविलेली जंगली हत्ती पकड मोहिम यशस्वी झाल्यानंतर वन विभागाने हत्तींना सिंधुदुर्ग मध्येच प्रशिक्षित करण्याचे निश्चत केले होते, हे खरे आहे काय,
(२) दुसऱ्यांदा राबविलेल्या हत्ती पकड मोहिम मध्ये गणेश, समर्थ आणि भीम अशा तीन हत्तींना पकडण्यात आल्यानंतर सदरहू हत्ती वन विभागाच्या ताब्यात असताना, गणेश हत्तीचा दिनांक १० एप्रिल, २०१५, समर्थ हत्तीचा दिनांक २९ एप्रिल, २०१५ मृत्यू ओढवलेला आहे व भीम हत्तीही जखमामुंळे मरणासन्न अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासकीय पातळीवर दुर्लक्ष, पुरेशा गांभीर्याचा अभाव व पायातील जखमामुळे या पकडलेल्या तीन हत्तीपैकी दोघांचा मृत्यु झालेला असल्यामुळे व भीम हा तिसरा हत्ती मरणासन्न अवस्थेत असल्याने या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी तेथील लोकप्रतिनिधीनी, उपवन संरक्षक, मा.वनेमंत्री आदींकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ते (५) कर्नाटक राज्यातील हत्ती तज्ञ डॉ. के. एस.उमाशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधुदुर्ग जिल्ह्यात माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये राबविण्यात आलेल्या माहिमेमध्ये ३ हत्तींना पकडून आंबेरी येथे क्रॉलमध्ये बंदीस्त करण्यात येवून देखभाल करण्यात येत होती.

क्रॉलमध्ये बंदिस्त करण्यात आलेल्या वन्य हत्तीना हत्ती तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ते खाद्य व औषधे वेळेवर देण्यात येत होते.

सदर तीन वन्य हत्तीपैकी दिनांक १०.०४.२०१५ रोजी गणेश हत्तीचा मृत्यू हृदयविकाराने (Congestive Cardiac Failure) व दिनांक २९.५.२०१५ रोजी समर्थ हत्तीचा मृत्य Stress, Septicemia and Respiratory Failure मुळे झाल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

लोक्रप्रतिनिधीनी, उपवन संरक्षक, मा.वनेमंत्री आदीकडे सदर प्रकरणी चौकशीची मागणी केली आहे. हे खरे आहे. मा.मंत्री (वने) यांनी वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार शासनाने प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांनी दि. ६ जून २०१५ रोजी आंबेरी येथील क्रॉलला भेट देऊन सदर प्रकरणाची चौकशी केली आहे, सदर चौकशीत स्थानिक पशु वैद्यकीय अधिकारी, वन विभागच्या कर्मचाऱ्यांकडून हत्तींची देखभाल करण्याच्या प्रयत्नात व लक्ष देण्यात कुचराई झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, सदर कामाचा पुर्वानुभव नसल्याने भीम हत्तीची प्रकृती चांगली असल्याने डॉ. के.एस उमाशंकर व त्यांच्या पथकाबरोबर पुढील प्रशिक्षणासाठी दिनांक ११.०८.२०१५ रोजी कर्नाटक राज्यातील राजीव गांधी राष्ट्रीय उद्यान, होणसूर येथील मत्तीगोडा हत्ती कॅम्पमध्ये पाठविण्यात आले आहे.

---

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या निसर्ग परिचय केंद्र याकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था

**(२४) २०५१२ (१४-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या निसर्ग परिचय केंद्र याकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने टिकूजीनीवाडी टाटा पावर हाऊस, मानपाडा या परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता नादुरुस्त असल्याने निसर्ग परिचय केंद्रला भेट देणाऱ्या पर्यटक, अभ्यासक व विद्यार्थी यांची संख्या नगण्य झाल्याने शासनाचा महसूलात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन उपरोक्त प्रकरणी उपाय योजना करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

निसर्ग परिचय केंद्र मानपाडा येथे भेट देणाऱ्या पर्यटक, अभ्यासक व विद्यार्थी यांच्या संख्येत कोणत्याही प्रकारची घट झाली नसून मागील ३ वर्षाच्या तुलनेने सदरच्या संख्येत वाढ झाली असून शासनाच्या महसूलातही वाढ झालेली आहे.

(३) हे खरे आहे.
(४) सदरच्या रस्ता हा पूर्वीपासून अस्तित्वात आहे व त्याच्या वापर स्थानिक नागरीक पूर्वीपासून करीत आहेत. सदर रस्त्याच्या सततच्या वापरामुळे रस्त्यावर खड्डे पडणे/रस्ता खराब होणे त्यामुळे सदर रस्त्याची दयनीय अवस्था झाल्याने सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत तेथील नागरीकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहे ऑक्टोबर २०१३ मध्ये ठाणे महानगरपालिकेने सदर रस्त्याची डागडुजी केली आहे. सदरचा रस्ता पुन्हा दुरुस्त करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मान्यतेसाठी वनविभागास सादर करणेबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

---

### उपवन संरक्षक नागपूर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(२५) २०८०२ (१७-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर प्रादेशिक वन विभागाचे उपवनसंरक्षक दिपक भट यांच्याकडून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि. २९ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास सुमारे १९ लाख २५ हजार रुपये हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.भट यांनी वनपाल व वनरक्षक कर्मचाऱ्यांच्या बदल्यासाठी ही रक्कम गोळा केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणात वरिष्ट अधिकाऱ्यांचा समावेश आहे काय,
(५) असल्यास, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) लाचलूचपत प्रतिबंधक विभागाद्वारे केलेल्या तपासणीमध्ये श्री.भट यांच्याकडून जप्त केलेल्या रकमेचा स्त्रोत स्पष्ट करु न शकल्याने सदर रक्कम अपसंपदा गृहीत धरून श्री.भट यांच्याविरुध्द लाचलूचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री. भट यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.
(४) प्रथमदर्शनी अशाप्रकारे बाब आढळून आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातगांव (ता.पाचोरा, जि.जळगाव) डोंगरी शिवारातील एका शेतात काम करणा-या दोन महिलांवर रानडुकराने केलेला हल्ला**

**(२६) २१६९१ (१७-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातगांव (ता.पाचोरा, जि.जळगाव) डोंगरी शिवारातील एका शेतात काम करणा-या दोन महिलांवर रानडुकराने दिनांक १३ मे, २०१५ रोजी हल्ला केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाचोरा येथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी जळगाव येथे न्यावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, जखमींना तातडीने शासनाच्या निकषानुसार आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, आर्थिक मदत मिळण्यास होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) रानडुकराच्या हल्ल्यात जखमी झालेल्या दोन्ही महिलांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी रु.१५,०००/- प्रमाणे एकूण रु.३०,०००/- अदा करण्यात आले आहेत.

---

**खर्डी विभागातील घनदाट जंगलात वनकर्मचारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने होत असलेली चोरटी लाकूडतोड**

**(२७) २१८१२ (१४-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी विभागातील घनदाट जंगलात वनकर्मचारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने चोरटी लाकूडतोड होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे औषधी वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर असून त्यामुळे आदिवासींना वणवण फिरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खर्डीत निसर्गाचा लहरीपणा पावसाचा अनियमितपणा बेसुमार जंगलतोडे व जंगलांना लागणारे वणवे यामुळे या भागातील दुर्मिळ वन औषधी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, यावर शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) ठाणे जिल्ह्यातील शहापूर वनविभागातील खर्डी वनक्षेत्रात औषधी वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर असून त्यामुळे आदिवासींना वणवण फिरावे लागत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- संवेदनशिल/अतिसंवेदनशिल नियतक्षेत्रांची नियमितपणे तपासणी करणे.
- वनोपज तपासणी नाक्यांवर तसेच रस्त्याने संशयास्पदरित्या जाणारी वाहने अडवून त्यांची झडती घेणे.
- वनगुन्हा नोंदविल्यानंतर त्याबाबत समरी ट्रायल्स्च्या तरतुदीनुसार न्यायालयाचे लक्ष वेधून तात्काळ कारवाई करणेस विनंती करणे.
- रात्रग्रस्त घालणे, अचानक धाडी घालणे, नाकाबंदी करणे, खबऱ्यांकडून बातमी काढून त्यानुसार धाडी घालणे.
- ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन या कार्यक्रमांविषयी स्थानिक जनतेस महत्व विषद करुन त्याव्दारे जनजागृती करणे.
- वनविभागात स्थापन करण्यात आलेल्या वनसंरक्षण समित्यांचा वनसंरक्षणाचे कामात सक्रिय सहभाग करुन घेणे.

---

## पन्हाळा - जोतिबा वनक्षेत्रामध्ये दुर्मीळ प्राणी, पक्षी व राष्ट्रीय पशु पक्षी यांची रामरोसपणे शिकार केल्याबाबत

**(२८) २१८४३ (१७-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा - जोतिबा वनक्षेत्रामध्ये दुर्मीळ प्राणी, पक्षी व राष्ट्रीय पशु पक्षी यांची राजरोसपणे शिकार केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिकार केलेल्या प्राण्यांची राजरोस विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिकार कारणारी टोळी मध्यप्रदेश मधून सदर ठिकाणी वास्तव्यास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर लोकांच्या वास्तव्यासंदर्भात कोणतीही नोंद ग्रामपंचायत अथवा संबंधित पोलीस ठण्याकडे नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पशु - पक्ष्यांची व वन्य प्राण्यांची राजरोस हत्या हात असताना या क्षेत्रातील वन अधिका-यांनी संबंधिताच्यावर कोणती कारवाई केली आहे,

(६) नसल्यास, शासन संबंधित अधिका-यांवर व शिका-यांच्यावर कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यशासनाच्या अखत्यारितील वनविभागाच्या जंगलाला गत चार वर्षात दीड लाख हेक्टर जंगल आगीमुळे नष्ट झाल्याबाबत

**(२९) २२०६५ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यशासनाच्या अखत्यारितील वनविभागाच्या जंगलाला गत चार वर्षात दीड लाख हेक्टर जंगल आगीमुळे नष्ट झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तीस-या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगीमुळे जवळपास एक कोटी वनसंपत्तीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जंगलाला आग लागल्यास यावर नियंत्रण आणण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) सन २०१२ते २०१५ या कालावधीतील जळालेल्या वनक्षेत्राच्या वर्षनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | आगीच्या घटना | जळालेले वनक्षेत्र हेक्टर | नुकसान (लाख रु.) | % जळालले क्षेत्र एकूण वनक्षेत्राच्या तुलनेत |
|---|---|---|---|---|
| २०१२ | ४७४३ | ७१४८१.६२ | ३४.०३ | १.१५ |
| २०१३ | २९२८ | २१०६४.५४ | १९.६८ | ०.३४ |
| २०१४ | २६८३ | १६८३८.७९ | २५.३४ | ०.२७ |
| २०१५ | १६८६ | १०२६३.७८ | १७.११ | ०.१७ |

सन २०१२ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये जळालेल्या वनक्षेत्रात सरासरी ७ पटीने घट झाली आहे.
(२) आगीमुळे मागील ४ वर्षात सरासरी प्रतिबर्षी ३०.०० लाख इतके नुकसान झाले आहे. सन २०१५ मधील आगीमुळे झालेले नुकसान जवळपास १७.०० लाख इतके आहे.
(३) वनक्षेत्रास आग लागल्याचे निदर्शनास येताच स्थानिक गावकऱ्याच्या/वनसंरक्षण समित्यांचे सहाय्याने आग विझविण्यात येते. तसेच यासंदर्भात गुन्हा नोंदवून आरोपीचा त्वरित शोध लावण्याचा प्रयत्न केला जातो.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा सुधारण्याच्या व परिपूर्ण विकास करण्याऱ्या विकास आराखड्याबाबत

**(३०) २२१८१ (१४-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा सुधारण्यासाठी व परिपूर्ण विकास करण्यासाठी विकास आराखडा तयार करून शासनाकडे सादर करण्याचे निर्देश मा.वनमंत्री यांनी मुख्य वनसंरक्षक यांना दिल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास आराखडा तयार करून शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त विकास आराखड्या अनुषंगाने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा सुधारण्यासाठी व परिपूर्ण विकास करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा सुधारण्यासाठी बफर क्षेत्रातील ५० गावांमध्ये जन वन विकास योजना राबविण्यात येत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या निसर्ग पर्यटन सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांच्यामार्फत, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प यांच्यामार्फत सल्लागार नियुक्तीकरिता Request for Proposal काढण्यात येत असून सल्लागारांमार्फत Detailed Project Report बनविणे अपेक्षित आहे.

---

## चंद्रपूर विभागातील प्रदुषण कमी करण्यासाठी सभोवतालचे वनक्षेत्रात (चंद्रपूर-घुग्घुस-ताडाळी या भागात) कृत्रिमरित्या लागवड केलेल्या रोपांबाबत

**(३१) २२१८४ (१७-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर विभागातील प्रदुषण कमी करण्यासाठी चंद्रपूर वन विभागाअंतर्गत असलेल्या चंद्रपूर सभोवतालचे वनक्षेत्रात (चंद्रपूर-घुग्घुस-ताडाळी या भागात) मागील ५ वर्षात सन २००९ ते २०१३-१४ या वर्षात ३९४.२४ हेक्टर क्षेत्रामध्ये ४१६१६४ रोपे कृत्रिमरित्या लागवड करण्यात आली असल्याचे तसेच विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वनप्रकल्प, चंद्रपूर यांच्यामार्फत खाणीकर्मातील डंप्पींग क्षेत्रात सन २००९ ते २०१३ या वर्षात ३९०.१४१ हेक्टर क्षेत्रामध्ये १०३६५९२ रोपे कृत्रिमरित्या लागवड करण्यात आली असल्याचे लेखी उत्तर मा.वने मंत्री यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ चे क्र. कपासू-२०१३/प्र.क्र.३४२/फ-२ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृत्रिमरित्या लागवड केलेल्या रोपांवर साधारण किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, चंद्रपूर-घुग्घुस-ताडाळी या भागात मागील ५ वर्षात लागवड केलेल्या रोपांची सध्या स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) होय.
(२) सदर कृत्रिमरित्या लागवड केलेल्या रोपांवर चंद्रपूर वन विभागास सन २००९ ते २०१३ या कालावधीत रु ५३.५० लाख व विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वनप्रकल्प, चंद्रपूर यांनी सन २००९ ते मार्च, २०१५ पर्यंत रु. १०८.३७ लाख इतका निधी खर्च करण्यात आला.
(३) चंद्रपूर वन विभागाअंतर्गत मागील ५ वर्षात लागवड केलेल्या रोपांची सद्य:स्थिती उत्तम असून जिवंत रोपांची सरासरी टक्केवारी ८९.७५% आहे. तसेच विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वनप्रकल्प, चंद्रपूर अंतर्गत करारनाम्याच्या अटीनुसार ८०% जिवंत रोपे संबंधित एजन्सीला हस्तांतरीत करावयाचे असतात. अशा रोपांची सद्य:स्थिती उत्तम आहे.

---

## वढोदा परिक्षेत्रातील वाघीणीचा झालेला मृत्यू

**(३२) २३००७ (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वढोदा परिक्षेत्रात माहे मार्च, २०१५ च्या अखेरीस आजारी वाघीणीचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा मृत्यू स्थानिक वनविभागाच्या हलगर्जीपणामुळे झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अधिकाऱ्यांची चौकशी सुरु असून त्यात त्याला निरापराध दाखविण्याचे प्रयत्न सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासन तातडीने निर्णय घेणार आहे काय, असल्यास केव्हा ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०९-२०१५) :** (१) वडोदा परिक्षेत्रात डोलारखेडा परिमंडळ येथे दिनांक ०१.०४.२०१५ रोजी १ वाघिण मृतावस्थेत आढळून आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

शवविच्छेदन अहवालात सदर वाघिणीचे वय १५ ते १६ वर्ष नमूद करण्यात आले आहे. मृत वाघिणीचा व्हिसेरा न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आला असता त्यात विष नसल्याचे त्यांचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सदर वाघिणीचे वयोमान बघता तिचा मृत्यू नैसर्गिक असावा असा प्रथमदर्शनी अंदाज आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भुसे (ता.निफाड, जि.नाशिक) या गावी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात चार वर्षीय बालकाचा झालेला मृत्यु**

**(३३) २३१४० (१४-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भुसे (ता.निफाड, जि.नाशिक) या गावी दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी रात्री बिबट्याने केलेल्या हल्ल्यात चार वर्षीय बालकाचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,

(३) असल्यास, बिबट्याच्या हल्ल्यात मृत पावलेल्या बालकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१५) :** (१) व (२) दिनांक १७.०४.२०१५ रोजी मौजे भुसे, ता.निफाड येथील पोटे वस्ती येथे कु.गणेश मदन पोटे वय वर्षे ४ याच्यावर त्याच्या राहत्या घराच्या अंगणात खेळत असताना बिबट्याने हल्ला करुन ठार केले हे खरे आहे.

(३) प्रचलित शासन निर्णयानुसार मृत मुलाच्या कायदेशीर वारसास रु. ८ लाख आर्थिक मदत अदा करण्यात आली आहे.

---

**जातेगांव (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील अतिप्राचीन पिनाकेश्वर मंदिर परिसराचा वनपर्यटन योजनेत समावेश करुन विकास करणेबाबत**

**(३४) २३१४६ (१४-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातेगांव (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील अतिप्राचीन पिनाकेश्वर मंदिर परिसराचा वनपर्यटन योजनेत समावेश करुन विकास करणेबाबतची मागणी लेखी निवेदनाद्वारे दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास नांदगांव मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री वने यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) शासनाचे पर्यटन धोरणानुसार सदरहू परिसरातील पर्यटन कामांचा आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील चांदोली अभयारण्यामुळे विस्थापीत झालेल्या मौजे-झोळंबी गावातील ग्रामस्थांना प्रत्येकी १ गुंठा जमीन देण्याच्या मागणीबाबत**

**(३५) २३५५६ (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील चांदोली अभयारण्यामुळे मौजे झोळंबी (आष्टा-पोखर्णी) गावातील विस्थापित झालेल्या ग्रामस्थांनी त्यांना वन खात्याच्या आष्टा येथील पडीक जमिनीतून प्रत्येकी एका गुंठा जमिन देण्यात यावी म्हणून जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे समक्ष व लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ग्रामस्थ मागील १५ वर्षे ही मागणी करीत असूनही जिल्हाधिका-यांनी याबाबतील सबंधित ग्रामस्थांशी बैठक घेवून त्यांच्या मागणीबाबत कोणताही विचार अद्‌याप केलेला नाही, पर्यायाने तेथील ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतीत शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात यत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) आष्टा येथील जमीन महसूल खात्याचे ताब्यात असल्याने सदरची जमीन महसूल विभागाकडून वन विभागाचे ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर जमीन वन विभागाकडे वर्ग करण्यात आल्यावर चांदोली अभयारण्याचे पुनर्वसनासाठी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्द असलेल्या पर्वतीवर वनांची, प्रामुख्याने चंदनाच्या झाडांची राजरोसपणे तोड होत असल्याबाबत**

**(३६) २३७०४ (१७-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्द असलेल्या पर्वतीवर वनांची, प्रामुख्याने चंदनाच्या झाडांची राजरोसपणे तोड होत असल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यदायी पर्वत म्हणून रोज शेकडो पुणेकर पर्वतीवर जात येत असतात परंतु या ठिकाणी होत असलेल्या वनांची तोडीमुळे भविष्यात पर्यावरणाची हानी होत असून प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने सदर वृक्षतोड थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) पाचगाव पर्वती येथे माहे एप्रिल, २०१४ ते अद्यापपर्यंत वृक्षतोडीच्या ४ घटना घडलेल्या आहेत. त्यात एकूण ११ वृक्षांची तोड झाली आहे. त्यापैकी एका घटनेत चंदनाच्या चार बुडांची अवैध तोड झाल्याचे निदर्शनास आले असून संबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पाचगाव पर्वती येथे नागरी संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम राबवून अवैध वृक्षतोडीस प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

---

## मुक्ताईनगर, चोपडा व यावल (जि. जळगांव) तालुकयातील वन जमिनीतून मिळणारी वनसंपत्ती चा वनमाफियांनी अपहार केल्याबाबत

**(३७) २४२७१ (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर, चोपडा व यावल (जि. जळगांव) तालुक्यातील वन जमिनीतून मिळणारी वनसंपत्ती चा वनमाफियांनी अपहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकतेच एस.सी.नी. ने एक टन ओल्या डिंकाच्या बेकायदेशीररित्या तस्करी करणा-यांना ताब्यात घेतले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जंगलातील झाडांवर अघोरी प्रयोग करुन अतिरिक्त डिंक मिळविण्यासाठी प्रयत्न केल्याने दोघांना अटक करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक वन अधिकारी व वन कर्मचारी ते तस्करी रोखण्यास असमर्थ ठरले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, वन संपत्ती तस्करी रोखणेबाबत व दोषी कर्मचा-यांवर शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) माहे एप्रिल, २०१५ मध्ये मुक्ताईनगर वनक्षेत्रात तापी नदीच्या पुलावर स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांनी एक टन ओल्या डिंकाची बेकायदेशीररित्या वाहतूक करता असताना दोन आरोपींना ताब्यात घेतले असून माल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने आरोपींना वनविभागाच्या ताब्यात दिले आहे. त्यानुसार आरोपीविंरुध्द आरोपपत्र दाखल करण्यात येऊन भुसावळ न्यायालयात दिनांक २३.०६.२०१५ रोजी केस दाखल करण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तृतीय पंथीयांच्या विकासासाठी महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(३८) २४५३६ (३०-०७-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील तृतीय पंथीयांच्या विकासासाठी राज्य शासनाने जाहिर केलेल्या महिला धोरणाच्या अनुषंगाने महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे काय, असल्यास केव्हा व त्याची रचना व कार्यकक्षा कशाप्रकारे करण्यात आलेल्या आहेत,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व सदर महामंडळ साधारणतः किती कालावधीत स्थापन करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक २८.८.२०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमधील निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबत दिनांक ०६.०९.२०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) सदर मंडळाची संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्याचे आणि संस्थेची नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान सात शासकीय सदस्यांचे मिळून कार्यकारी मंडळाची रचना आणि संस्थेच्या उद्देशासह संस्थेच्या मेमोरँडम ऑफ असोशिएशन आणि नियमावलीचा मसुदा विधी व न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. विधी व न्याय विभागच्या मान्यतेनंतर सदर मंडळाच्या नोंदणीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बागलाण (जि.नाशिक) येथील जंगल संपत्ती नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(३९) २४६१२ (१४-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण (जि.नाशिक) येथील जंगल संपत्ती नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे मे २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जंगल संपत्ती केवळ वनअधिका-यांच्याच दुर्लक्षामुळे नामशेष होत आहे याची शासनास माहिती आहे काय,

(३) असल्यास, यास जबाबदार असलेल्या वनअधिका-यांवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, वृक्ष लागवड व संवर्धनासाठी शासन अधिक ठोस उपाय योजना करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) ता.बागलाण जि.नाशिक मधील सटाणा व ताहाराबाद वनपरिक्षेत्रात जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१५ पर्यंत एकूण १२२ वृक्षांची अवैध तोड झालेली आहे. त्यामध्ये एकूण रु.१,२३,२६१ रु चे नुकसान झाले असून जप्त मालाची किंमत रु. २४,५५७ इतकी आहे. सदर तालुक्यातील जंगलसंपत्ती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याची बाब खरी आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) वृक्ष लागवड व संवर्धनासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- शासकीय जमिनीवर लागवड केलेल्या वृक्षांची जोपासना करण्याकरिता लागवड क्षेत्रावर संरक्षण मजूराची नेमणूक केली जाते.
- संबंधित गावातील संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत तसेच गावकऱ्यांच्या मदतीने रोपवनाचे संरक्षण केले जाते.
- वन अधिकारी/कर्मचारी वनसंवर्धनासाठी नियमितपणे गस्त घालतात.

---

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे पिसाळलेल्या वानराने हल्ला करुन एका व्यक्तीला जखमी केल्याबाबत

**(४०) २४७३० (०४-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास पिसाळलेल्या वानराने हल्ला करुन एका व्यक्तीला जखमी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पिसाळलेले वानर पकडण्याकरिता वन विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे वानर पकडण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच जखमीग्रस्तांना कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) तक्रार प्राप्त होताच सिंदेवाही परिक्षेत्रातील वन अधिकारी / कर्मचारी, रॅपिड रिस्पॉन्स युनिट तसेच पशुवैद्यकीय अधिकारी यांनी पिसाळलेल्या वानरास ट्रॅन्क्विलाईज करुन पकडले.

(४) प्रचलित शासन निर्णयात वानराने हल्ला करुन जखमी केल्यास आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद नाही त्यामुळे आर्थिक सहाय्य देण्यात आलेले नाही.

---

**वन्यजीवाच्या संरक्षणार्थ पर्यायी मार्गाने वाहतुक करणेबाबत**

**(४१) २५३३२ (०४-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यातून जाणाऱ्या चांदवड-परतवाडा या राज्य महामार्गामुळे अपघातात बिबट्या व अन्य वन्यजीव ठार झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यजीवांच्या संरक्षणार्थ सदर मार्ग बंद करुन पर्यायी मार्गाने वाहतूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन वाहतुकीचा मार्ग व त्यासाठी आवश्यक तरतूद निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास वन्यजीवांच्या सरंक्षणासाठी शासन कोणत्या उपाययोजना हाती घेणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०९-२०१५) :** (१) ज्ञानगंगा अभयारण्यातून जाणाऱ्या बुलढाणा-वरवंड-बोथा-खामगाव या राज्यमार्ग क्रमांक २४ वरील वाहनांच्या अपघाताने वन्यप्राण्यांच्या मृत्यूच्या घटना घडत असतात हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हादंडाधिकारी, बुलढाणा यांच्या दिनांक १६.७.२०१५ च्या आदेशान्वये वन्यजीवांच्या संरक्षणार्थ राज्यमार्ग क्रमांक २४ वरील वाहतूक रात्री १०.०० ते सकाळी ५.०० वाजेपर्यंत बंद करण्यात आली असून पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्यात आली आहे.

---

**राष्ट्रीय वनक्षेत्र नियमावलीनुसार प्रत्येक राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र बंधनकारक असताना, महाराष्ट्रात केवळ १९.४३ टक्के वनक्षेत्र शिल्लक राहिल्याबाबत**

**(४२) २५५२६ (१७-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वनक्षेत्र नियमावलीनुसार प्रत्येक राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र बंधनकारक असताना, महाराष्ट्रात केवळ १९.४३ टक्के वनक्षेत्र शिल्लक राहिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्रात ८ हजार ७२० किलोमिटर घनदाट जंगल असून, त्यातील २० हजार ७७० किलोमीटर हे विरळ तर २१ हजार १४२ किलोमिटर हे राखीव वनक्षेत्र असून, त्यापैकी वनक्षेत्रातील ट्री कव्हर वगळल्यास सध्या केवळ १६ टक्के वनक्षेत्र उरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :** (१) व (२) राष्ट्रीय वन धोरण १९८८ नुसार देशातील भौगोलिक क्षेत्राच्या तृतीयांश क्षेत्र व वृच्छादनाखाली असावे असे उद्दिष्ट आहे. सध्या महाराष्ट्रात १९.९४% क्षेत्र वृच्छादनाखाली आहे. त्यापैकी १६.४५% वनक्षेत्र आहे.

(३) व (४) राज्यातील वन व वृक्षआच्छादन वाढविण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या जातात.

- नियमीतपणे वृक्ष रोपणाची कामे केली जातात.
- शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमामध्ये दरवर्षी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरवून दिले जाते. अवनत वनांचे पुनर्वनीकरणासाठीच्या योजना राबविल्या जातात.
- २० कलमी कार्यक्रम, योजना व योजनेत्तर वृक्ष रोपवने, मनरेगा अश विविध योजनातंर्गत वृक्ष लागवड कार्यक्रम राबविले जातात.
- सदर योजना वन व सामाजिक वनीकरण वन विभाग महामंडळ, ग्रामविकास विभाग, कृषी व फलोत्पादन विभाग इ. विभागांकडून राबविली जाते.
- तसेच अनेक अशासकीय संस्था देखील नियमीतपणे वृक्षरोपण करीत आहेत.

---

## आजारा तालुक्यात (जि.कोल्हापूर) वनौषधी पार्क उभारण्याबाबत

**(४३) २५७०० (१७-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजारा तालुक्यात (जि.कोल्हापूर) वनौषधी पार्क उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही. सन २०१५-१६ च्या वार्षिक योजनेमध्ये आजरा तालुक्यात (जि.कोल्हापूर), वनौषधी पार्क उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात रानडुक्कर व हरीण या सारख्या वन्यप्राण्याच्या उपद्रवामुळे पिकांचे व शेतीचे मोठे नुकसान होत असल्याबाबत

**(४४) २५७७७ (०४-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात रानडुक्कर व हरीण या सारख्या वन्यप्राण्याच्या उपद्रवामुळे पिकांचे व शेतीचे मोठे नुकसान होत असल्याच्या तक्रारी शेतकरी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय किसान संघाचे महामंत्री यांनी याबाबत दिनांक १६ मे, २०१५ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे याबाबत तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोशीकीय एंव अन्विक जीव विज्ञान केंद्र, हैद्राबाद यांनी दिनांक १५ मे, २०१४ अन्वये बीड जिल्ह्यात पीक नुकसान करणारे प्राणी रानडुक्कर नसून पाळीव डुक्कर असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वन विभागाने उक्त संस्थेकडे दिलेल्या जैविक नमुन्यांचे फेर सर्व्हेक्षण करण्याचे आदेश मा.मंत्री वने यांनी दिल्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) बीड जिल्ह्यातील रानडुक्करांकडून शेतकऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यातील जखमींना मदत देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०९-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) गेवराई तालुक्यातील ४ गावांचे शेतातील डुक्करांचे रक्त, मांसाचे नमूने फेरतपासणीकरता हैद्राबाद येथील कोशकिय संस्थेस पाठविले असता सदर डुक्कर हे रानडुक्कर असल्याचे दिनांक २४.०६.२०१५ च्या अहवालात नमूद केले आहे. रानडुक्करांच्या हल्ल्यात व्यक्ती जखमी / मृत पावल्यास किंवा रानडुक्कराने शेतीपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयानुसार आर्थिक नुकसान भरपाई अदा करण्यात येत आहे.

---

## वन परिक्षेत्र अधिकारी (ता.महागांव, जि.यवतमाळ) यांच्यामार्फत जलसंवर्धनाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४५) २५७९९ (०४-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१३ ते २०१६ जुन पर्यंत वन परिक्षेत्र अधिकारी (ता.महागांव, जि.यवतमाळ) यांच्यामार्फत जलसंवर्धनाच्या दगडीबांध, सिमेंटनाला बांध, मातीनाला बांध पाणीसाठवण तलाव महागाव तालुक्यत संबंधीत कामे फार मोठ्या प्रमाणात झाल्याची दाखवून प्रत्यक्ष कामे न करताच करोडो रुपयांची बिले उचलण्यात आली आहेत, या बाबतची उच्च स्तरीय चौकशी करुन संबंधीत दोषी अधिका-यांवर शासन कायदेशीर कार्यवाही करणार आहे काय,
(२) असल्यास, कामे करणा-या संबंधीत अधिका-यांने महागाव तालुक्यतील कामे न करताच लाखो रुपयांची बिले काढली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानातून महागांव प्रादेशिक वन क्षेत्राअंतर्गत संयुक्त वनव्यवस्थापनक समिती, करंजखेड मार्फत बिट कक्ष क्रमांक ४६० व ४६१ मध्ये रितसर अंदाजपत्रक तयार करुन व आवश्यक त्या मान्यता घेऊन एप्रिल, २०१५ या कालावधीत दोन मातीनालाबांध बांधण्यात आले. सदर कामाकरीता रुपये १,१८,६००/- अनुदान उपलब्ध झाले होते. सदर अनुदानातून मातीनाला बांधकाम परिपूर्ण करण्यात आली असून सदर कामे प्रत्यक्ष ठिकाणी योग्य स्थितीत आढळून आलेली आहेत. सदर कामावर काम केलेल्या रोहयो कामगारांची मजूरी त्यांच्या बँक खात्यामध्ये परस्पर जमा होते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील आदिवासींच्या सागवान विक्रीची मोठी लूट केली जात असल्याबाबत**

**(४६) २५९३७ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील आदिवासींच्या शेतातील सागवान विकायचे झाल्यास त्यास वनखात्याची मंजूरी घेऊन वन विभाग याची वृक्षतोड करुन आपल्या वन उपडेपोमध्ये नेऊन लिलाव करतो आणि आलेली किंमत त्या आदिवासी लाभार्थ्याला दिली जाते. परंतु सद्यस्थिती मात्र या भागात नियमानुसार न करता किनवटच्या एका लाकडाच्या गुत्तेदारामार्फत ही सागवान वृक्षतोड करुन ते डेपोला न देता परस्पर जवरलाच्या शासकीय आश्रम शाळेसमोर आदिवासींच्या सागवान विक्रीची मोठी लूट केली जात असल्याचे दिनांक २७ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मा.राज्यपाल हे जवारला गावाला भेट देण्यास येण्याअगोदरच त्यांच्या तयारीनिमित्त बनावट कामे सुरु करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणा-या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) महाराष्ट्र झाडे तोड (नियमन) अधिनियम १९६४ सुधारणा १९८९ चे कलम ३ (१) ब अन्वये अनुसूचित भोगटवदाराचे क्षेत्रातील झाडे तोडणे व अनुसूचित भोगवटदारांचे झाडांची विक्री अधिनियम १९६९ कलम ६ (४) मधील सुधारणा १९९६ नुसार आदिवासी भोगवटदारांना झाडे तोड व विक्री करुन लाभर्थ्यांना लाभ दिला जातो, हे खरे आहे.

तथापि, नांदेड जिल्ह्यात वरील नियमांचे पालन न करता लाकडाच्या गुत्तेदारामार्फत सागवान कटाई करुन ते डेपोला न आणता परस्पर विक्री केली जात असल्याचे दिनांक २७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर तालूक्यातील खर्डी लांडग्यांनी केलेल्या हल्यात ११ शेळ्या व १ जर्सी कालवडीचा मृत्यु झाल्याबाबत**

**(४७) २५९५७ (१७-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर तालूक्यातील खर्डी येथे दिनांक ५ जून, २०१५ रोजी शेतातील शेळया व कालवडीवर शुक्रवारी पहाटे २.०० वाजण्याच्या सुमारास अचानक ४ ते ५ लांडग्यांनी हल्ला केल्याने सुमारे ११ शेळया व १ जर्सी कालवडीचा मृत्यु झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरीब शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन पूर्णपणे उध्वस्त झालेले असल्यामुळे शासनाने त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०९-२०१५) :** (१) व (२) दिनांक ५.०६.२०१५ रोजी पंढरपूर तालुक्यातील मौजे खर्डी येथे श्रीमती लता शिवाजी खताळ, रा.खडी, ता.पंढरपूर यांच्या मालकीच्या ७ शेळ्या, १ बोकड व १ जर्सी कालवड लांडग्याने ठार केल्या आहेत. दिनांक ०२.०९.२०१५ रोजी संबंधितास प्रचलित शासन निर्णयान्वये रु. २४,०००/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कन्नड-वासडी (जि.औरंगाबाद) रस्त्यावरील खांडीत प्रादेशिक वन विभागाने सहा वर्षापूर्वी बांधलेली तपासणी नाक्याची इमारत वापराविना पडून असल्याबाबत**

**(४८) २६१०२ (१७-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नड-वासडी (जि.औरंगाबाद) रस्त्यावरील खांडीत प्रादेशिक वन विभागाने सहा वर्षापूर्वी बांधलेली तपासणी नाक्याची इमारत वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कन्नड ते वासडी रस्ता वन्यजीव विभागाच्या गौताळा अभयारण्यातून व प्रादेशिक वन विभागाच्या जंगलातून जात असून वन्यप्राणी शिकार, सागवान, चंदन व इतर लाकूड तस्करी, वन औषधी तस्करी, गौणखनिज, गारगोटी, रंगीत दगड, मुरुम, वाळू चोरी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनांवर आळा घालण्याकरीता सदरचा तपासणी नाका बांधला असतांना या इमारतीचा वापर अद्यापपर्यंत न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) सदर इमारत कन्नड वासडी रस्त्यावर असलेल्या खांडीमध्ये सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये तपासणी नाका म्हणून बांधण्यात आली आहे. ही इमारत कन्नड ते पिशोर या रस्त्यापासून १२ कि.मी. अंतरावर आहे. सदर इमारतीचा उपयोग वन संरक्षण कुटी (Forest Protection Hut) म्हणून करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर तपासणी नाक्याची इमारत वनसंरक्षण कुटी म्हणून वापरात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र पाटमादेवी (ता.चाळीसगाव, जि.जळगांव) येथे जखमी व आजरी वन्या प्राणी पक्षांवर उपचार करण्यासाठी आधार केंद्र उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४९) २६२७७ (१७-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र पाटमादेवी (ता.चाळीसगाव, जि.जळगांव) येथे जळगावसह धुळे, नंदूरबार नाशिक जिल्ह्यातील जखमी व आजरी वन्य प्राणी पक्षांवर उपचार करण्यासाठी आधार केंद्र उभारण्यात यावे अशी मागणी विविध संघटनांनी व नागरिकांनी वारंवार मा.मुख्यमंत्री व मा.वने मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाळीसगाव येथे सदरहू आधार केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय असल्यास, त्याअनुषंगाने पुढे कोणती तातडीने कार्यवाही केली आहे,
(४) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?
**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१५) :** (१) व (२) अशा प्रकारचे मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. चाळीसगांव येथे आधार केंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात आरोग्य तपासणीत हृदयरोग असलेल्या तब्बल ८ टक्के मुलांचे प्रमाण आढळल्याबाबत

**(५०) २६८४४ (१७-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिका-यांनी नुकत्याच केलेल्या आरोग्य तपासणीत हृदयरोग असलेल्या तब्बल ८ टक्के मुलांचे प्रमाण आढळले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हृदयरोग जडलेल्या मुलांवर योग्य ते औषधोपचार व औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी जिल्हा रुग्णालयामध्ये काय उपाययोजना करण्यात आली आहे वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, अद्याप उपाययोजना वा कार्यवाही सुरु झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-२०१६ (जुलै, २०१५ अखेर) ० ते १८ वयोगटातील मुलांच्या तपासणी दरम्यान हृदयग्रस्त आढळून आलेल्या मुलांचे प्रमाण हे ८ टक्के नूसन ०.०८ टक्के इतके आहे.

(२) जिल्हा रुग्णालय, ओरोस व रेडकर हॉस्पिटल, रेडी यांचे संयुक्त विद्यमान मालवण व रेडी येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या पथकाने संदर्भित केलेल्या १५० मुलांची २ डी इको तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४६ मुले हृदयग्रस्त आढळून आली असून, त्यानुसार १५ मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया जुलै, २०१५ अखेर करण्यात आल्या आहेत. उर्वरित ३१ मुलांपैकी ३ मुलांच्या पालकांनी शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला असल्याने त्यांना समुपदेशन करण्यात येत आहे. ३ मुलांची शस्त्रक्रिया जोखमीची असून ही मुले शस्त्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात आली आहेत. २५ मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी कार्डीॲक सर्जन कडून तपासणी करुन शस्त्रक्रियेसाठी तारीख घेण्याचे काम चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.